जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७४ दिनांक - ३०/०१/२०२५**

हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## हडपसर पोलीस स्टेशन अंतर्गत हुंडाबळी गुन्हयातील आरोपीस सात वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा

सदर घटना ही १५ नंबर, मनिष सुपर मार्केटमागे, लक्ष्मी कॉलनी, हडपसर, पुणे येथे दिनांक ३०/११/२०१२ ते दिनांक २५/०५/२०१३ रोजीच्या दरम्यान घडली आहे. यातील आरोपी १) **संतोष विठ्ठल पवार (पती),वय ४२ वर्षे रा. १५नंबर, मनिष सुपर मार्केटमागे, लक्ष्मी कॉलनी, हडपसर, पुणे २) विठ्ठल तुकाराम पवार (सासरे) वय ७१ वर्षे रा. सदर व ३) सौ. मंगल विठ्ठल पवार (सासू) वय ६५ वर्षे रा. सदर** यांनी लग्नात राहिलेली भांडी, दोन तोळे सोने, कुलर, फ्रिज, पिठाची गिरणी इ.वस्तू दिले नसल्याने ते घेऊन येण्या करीता हुंड्यासाठी मानसिक व शारिरीक छळ करुन मारहाण करीत होते. त्यामुळे दिनांक २५/०५/२०१३ रोजी मयत सविता संतोष पवार वय २३ वर्षे रा. सदर हिने राहते घरी सततच्या होणाया छळाला कंटाळून अंगावर रॉकेल ओतून पेटवून घेऊन मयत झाल्याने **हडपसर पोलीस ठाणे, पुणे शहर येथे गुन्हा क्रमांक २१५/२०१३ भा.दं.वि. कलम४९८(अ),३०४(ब),३४** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास श्री. बी.एम. पवार, पोलीस उप निरीक्षक यांनी केला व यातील आरोपींविरुद्ध मा.न्यायालयामध्ये मुदतीत दोषारोपपत्र सादर केले. सदर केसचा सेशन केस क्र. ९२४/२०१३ असा आहे.

वरील प्रकरणामध्ये सबळ साक्षीपुराव्याअंती मा. जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे यांनी आरोपींनादिनांक ३०/०१/२०२५ रोजी सात वर्षे सश्रम कारावास व ८ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास दोन महिने साधाकारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

सरकारी पक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्री. प्रदिप गेहलोत, कोर्ट पैरवी सपोफौ श्रीशैल तेलुनगी, व पोलीस अंमलदार अविनाश गोसावी, यांनी कामकाज पाहिले.सदर कामगिरी करीता प्रोत्साहन म्हणून मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५, पुणे शहर डॉ.राजकुमार शिंदे यांनी कोर्ट पैरवी सपोफौ श्रीशैल तेलुनगी व पोलीस अंमलदार अविनाश गोसावी व नमूद गुन्हयाचे तपासी अधिकारी पोउनि बी.एम. पवार यांना १० हजार रुपये बक्षिस मंजूर केले आहे.